जा.क्र.नांवाशमनपा/नसका/सिआर- 11/2018
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक:- 12/07/2018

**<u>नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.</u>**

**<u>सर्वसाधारण सभेची सूचना</u>**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनसूची ``ड`` चे प्रकरण-2 मधील नियम क्रं. 1 अन्वये

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची (ड) च्र प्रकरण-2 मधील नियम क्रं 1 अन्वये प्राप्त अधिकारानुसार **मा. महापौर, सौ. भवरे शिलाबाई किशोर** यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्व साधारण सभा **दिनांक 19.07.2018 रोजी सकाळी 11.00 वाजता नावाशमनपाकेच्या मुख्य प्रशासकिय इमारतीतील चौथ्या मजल्यावरील कै. शंकरराव चव्हाण सभागृहात आयोजीत केली आहे.**

करिता विनंती की, प्रस्तावित सभेस निर्धारीत समयी निर्दिष्ट ठिकाणी उपस्थित राहून सहकार्य करावे.

**(मा. महापौर यांच्या मान्यतेने)**

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**

**प्रति**
**श्री/श्रीमती -------------------------------**
**सदस्य /सदस्या,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**<u>आयुक्त यांच्याकडून प्राप्त कार्यालयीन प्रस्ताव</u>**

**विषय क्रं. 01 :-**

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/2135/18 दिनांक 19.05.2018 अन्वये श्री राजेश कचरु जोंधळे, पुरुष मजुर यांना दिनांक 17.05.2018 रोजी -हदयविकाराचा धक्का आल्याने त्यांना महिंद्रकर चेस्ट हॉस्पीटल नांदेड येथे दाखल केले असून संबंधीतांनी वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपुर्तीकरिता सदरील आदेशान्वये अग्रीम रक्कम रुपये 1,00,000/- (अक्षरी रुपये एक लक्ष) देण्याची विनंती केल्यानुसार त्यांना अग्रीम रक्कम रुपये 1,00,000/- अग्रीम रक्कम देण्यात आली त्याची नोंद घेणे बाबत

**विषय क्रं. 02 :-**

श्री सुहास रघुनाथराव सोनुले कंत्राटी सिटी प्रोग्राम मॅनेजर यांना एकत्रीत मानधन रुपये 30,000/- वर घेण्यात आलेले असुन त्यांच्या मुदत दिनांक 29.06.18 रोजी संपलेली असुन त्यांच्या सेवेत दि. 36.06.18 रोजीचा तांत्रीक खंड देवुन दि. 01.07.18 ते 30.12.18 पर्यंत मुदतवाढ देणे बाबतचा प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

**विषय क्रं.03 :-**

नांदेड वाघाळा शहरमहानगरपालिकेतील कंत्राटी पध्दतीने एकत्रीत वेतनावरील एकूण 08 वैद्यकिय अधिकारी/सहाय्यक वैद्यकिय अधिकारी व कंत्राटी सिनिअर डॉटस प्लस TB HIV सुपरवायजर-1 असे एकूण 09 कंत्राटी कर्मचा-यांचा दिनांक 30.06.18 चा सेवेत एक दिवसाचा तांत्रीक खंड देवुन दिनांक 01.07.18 ते 30.12.18 पर्यंत मुदतवाढ देणे करिता मान्यता घेऊन मुदतवाढ देणे बाबतचा प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

**विषय क्रं.04 :-**

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 52 नुसार अनाधिकृत बांधकामे प्रशमन आकार लावुन प्रशमित संरचना म्हणुन घोषीत करण्यासाठी अधिनियमाचे कलम 158(1) अन्वये मुदतवाढ देणे बाबत

**विषय क्रं. 05 :-**

नांदेड शहराच्या मंजुर सधारीत विकास योजनेमध्ये मौजा नांदेड मधील स.नं. 93/बी/1 तसेच न.भु.क्रं. 17864/2 पैकी 84 आर जागा इपी 21 नुसार सार्वजनिक निमसार्वजनिक वापरासाठी दर्शवलेली आहे. उक्त जागेत सार्वजनिक व निमसार्वजनिक वापरा ऐवजी रहिवास वापर करणेसाठी **श्री नगरेश्वर वैश्य मंदिर नांदेड तर्फे अध्यक्ष श्री दिलीप रामचंद्रराव बंडेवार** यांनी दिनांक 03.05.2017 अन्वये मंजुर सुधारीत विकास योजनेमध्ये महाराय्ष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) अन्वये किरकोळ फेरबदल करण्याची विनंती केली आहे. त्यानुसार कार्यवाही करणे बाबत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने सर्वसाधारण सभा ठराव क्रं. 35 दिनांक 26 मे, 2017 अन्वये फेरबदला बाबतचा ठराव समंत केला आहे.

फेरबदलाच्या अनुषंगाने मालमत्ताधारकांनी फेरबदलाचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यास सुनावणीच्या वेळी सांगितले आहे त्या प्रमाणे उक्त फेरबदलाचा प्रस्ताव शासनाकडे निर्णयासाठी पाठवण्यास मान्यता देणे बाबत

**विषय क्रं. 06 :-**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत चौकास / रस्त्यास नांव देण्याच्या उपसमितीने तिन रस्त्यास नांव देण्या बाबत केलेल्या शिफारसीनुसार निर्णय घेणे बाबत

**<u>स. सदस्या मार्फ आलेले प्रस्ताव/सुचना</u>**

**विषय क्रं. 07:-**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील मालमत्ता करा बाबत फेर सर्व्हेक्षण व फेर मुल्यांकन मोजमाप न होता मालमत्ताधारकांना मालमत्ता करा बाबत खास नोटीस काढण्यात आलेले आदेश रद्द करणे बाबत.

**सुचक** :- स. विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक** :- आनंद चव्हाण, अ. सत्तार अ. गफुर

**विषय क्रं. 08:-**

रिपब्लिकन चळवळीतील जेष्ठ नेते आमदार प्रा. जोगेंद्र कवाडे यांचा नांदेड जिल्हयाशी विशेष संबंधी राहिलेला असून संबंधीतास त्यांचे कार्य लक्षात घेता त्यांना अमृत महोत्सवी वर्षा निमित्ताने **<u>`` मानपत्र ``</u>** देवुन गौरव करण्याच्या ठरावास मान्यता देणे.

**सुचक**:- बापूराव गजभारे **अनुमोदक** :- आनंद चव्हाण

**विषय क्रं.09:-**

श्री तानाजी माधव केंद्रे हे अमरावती येथील शिक्षण आस्थापनेवर सह शिक्षक या पदावर दिनांक 12.06.06 पासुन कार्यरत आहेत संबंधीतांच्या व्यक्तीक अडचणीमुळे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड येथील शिक्षण आस्थापनेवर एकतर्फी आंतर जिल्हा बदलीने नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड येथे शिक्षण आस्थापनेवर एकतर्फी बदली करण्यास मान्यता देणे

**सुचक** :- आनंद चव्हाण **अनुमोदक** :- दयानंद नामदेवराव वाघमारे

**विषय क्रं. 10 :-**

श्रीमती अरुणादेवी बापुराव देशमुख हया जिल्हा परिषद नांदेड येथील शिक्षण आस्थापनेवर सह शिक्षक या पदावर दिनांक 03.08.1998 पासुन कार्यरत आहेत संबंधीतांच्या खासगी अडचणीमुळे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड येथील शिक्षण आस्थापनेवर एकतर्फी आंतर जिल्हा बदलीने सेवा वर्ग करण्यास मान्यता देणे.

**सुचक** :- आनंद चव्हाण **अनुमोदक** :- किशोर स्वामी

**विषय क्रं.11 :-**

श्रीमती आशा सुभाषराव सावंत हया जिल्हा परिषद नंदुरबार अंतर्गत जि.प.प्रा.शा देवसापाडा ता. धडगांव जि. नंदुरबार या शिक्षण आस्थापनेवर सह शिक्षक या पदावर दिनांक 31.12.2011 पासुन कार्यरत आहेत संबंधीतांच्या व्यक्तीक अडचणीमुळे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड येथील शिक्षण आस्थापनेवर एकतर्फी आंतर जिल्हा बदलीने सेवा वर्ग करण्यास मान्यता देणे.

**सुचक** :- आनंद चव्हाण **अनुमोदक** :- किशोर स्वामी

**विषय क्रं. 12:-**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत प्रभाग क्रं. 19, 20 संभाजी चौक ते विद्यादान कोचिंग क्लासेस पर्यंतचे मजबुतीकरण व दलितवस्ती सुधार योजने अंतर्गत प्रभाग क्रं. 20 मधील अनेक कामासह इतर अंतर्गत 21 कामाचा समावेश असलेली कामे करण्यास मान्यता देण्यात यावी.

**सुचक**:- बेबीताई जनार्दन गुपिले **अनुमोदक** :- इंदुताई शिवाजीराव घोगरे

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**